# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**Year (वर्ष):** 2021

**P.S.(ठाणे):** आष्टी

1. **District (जिल्हा):** बीड
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0299 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 06/10/2021 23:24 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार
**Date From (दिनांक पासून):** 06/10/2021
**Date To ( दिनांक पर्यंत):** 06/10/2021
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Time From (वेळेपासून):** 17:40 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 06/10/2021 **Time (वेळ):** 23:16 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 040 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/10/2021 23:16 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय ,आष्टी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
(a) **Name (नाव):** नानासाहेब सुखदेव गागरे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1976 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सुंबेवाडी,आष्टी ,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सुंबेवाडी,आष्टी ,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | जालिंदर गोपाळ नरसाळे | | | 1. गोरेगाव,पारनेर ,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 3000/ रुपये | 3,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 3,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादकम्प -आष्टी जि. बीड .   दिनांक :- 06/10/2021.मी नानासाहेब सुखदेव गागरे, वय-42 वर्ष,व्यवसाय-ड्रायव्हर,रा.सुंबेवाडी, पोस्ट-पिंपळा,ता.आष्टी जि.बीड ह.मु.गजानन कलनी,नगर मनमाड रोड, नागापुर, अहमदनगर, जि.अहमदनगर मो.क्र.-7744829191 दिनांक 29/04/2021 रोजी मी पोलीस उप अधीक्षक, श्री.हनपुडे पाटील, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड यांना फोन करुन मला एक लोकसेवक माझे कामासाठी पैशाची मागणी करत आहे. तरी कडा येथे येवुन  माझी तक्रार घेऊन कारवाई करणे बाबत विनंती केली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक रविंद्र परदेशी यांचे समक्ष हजर येवुन तक्रार दिली की, माझे सासरे लिंबराज बाबु शेळके रा. सुंबेवाडी पोस्ट पिंपळा ता.आष्टी जि.बीड यांचे नावे मौजे पिंपळा शिवारात शेत गट नंबर 237, 239, मध्ये चार एकर शेती आहे. सदर शेताची सातबाऱ्यावर वारसाची नोंद मा. न्यायालयाचे हुकुमनामा आदेशा प्रमाणे माझी सासु कमलबाई लिंबराज शेळके, माझी पत्नी आशाबाई नानासाहेब गागरे व मेव्हुणी राधाबाई दत्तोबा गव्हाणे यांचे नावे करण्यासाठी मा.न्यायालयाचा हुकुमनामा आदेशाची प्रत घेऊन मी  तलाठी श्री.नरसाळे यांचेकडे दिले सदर नोंद घेण्यासाठी तलाठी नरसाळे यांनी 5000/- रुपयाची लाचेची मागणी केली वगैरे मजकुराची तक्रार दिली होती .मी दिलेल्या तक्रारीवरुन दि.29/04/2021 रोजी पोलीस निरीक्षक श्री.परदेशी यांनी तलाठी नरसाळे हे माझ्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे याबाबत कडा येथे मला व पंच क्र.1 सोनवतीकर यांना पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर सदर लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने मला व पंचाना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर मला व पंच क्र.1 यांना तलाठी नरसाळे यांचेकडे पाठवले असता. मी व पंच क्र.1 असे तलाठी नरसाळे यांना भेटण्यासाठी कडा येथे जाऊन तलाठी नरसाळे यांची भेट घेतली असता तलाठी नरसाळे यांनी  माझ्याकडे  मा. न्यायलयाचे हुकुमनामा आदेशा प्रमाणे वारसाची नोंद घेण्यासाठी 5000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 3,000/-रु लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य केले. तसा दि.29/04/2021 रोजी लाचमागणी पडताळणीचा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे. त्यानंतर तलाठी नरसाळे यांचेविरुध्द लाच रक्कम उपलब्ध झाल्यानंतर सापळा कारवाईचे आयोजन करण्याचे ठरले. त्यावरुन दि.23/09/2021 रोजी कडा येथे सुरक्षितस्थळी दोन शासकीय पंचांसमक्ष श्री.परदेशी यांनी मला व दोन्ही पंचांना दि.29/04/2021 रोजी झालेल्या कारवाई बाबत माहिती देवुन अँथ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लम्प यांचा उपयोग व गुणधर्म सांगुन त्याचे प्रात्यक्षीक दाखवुन मी हजर केलेल्या 3,000/-रु.लाच रकमेस अँथ्रासीन पावडर लावली व सदरची लाच रक्कम ही माझे पँटचे समोरील उजवे खिशात ठेवली. मला लाच स्वीकृतीनंतर करावयाचा ईशारा नेमुन दिला. त्यानंतर मी व पंच क्र.1 काकडे असे आम्ही व्हईस रेकर्डर लाऊन तलाठी नरसाळे यांची भेट घेण्यासाठी जात असतांना तलाठी नरसाळे यांचा मला फोन आला  त्याचेशी माझी फोनवर कामासंदर्भाने चर्चा झाली त्यांनी मला तुमचे कागदपत्र माझेकडे असुन तुमचे काम हातावर घेतल्याचे व  मी गावाकडे निघुन आल्याने आपली  आज भेट होणार नाही आल्यावर फोन करुन कळवतो असे सांगीतले. त्यावर दिनांक 23/09/2021 रोजी

सापळापुर्व कारवाई व सापळा कारवाई स्थगीती पंचनामा करण्यात आला.दिनांक 06/10/2021 रोजी मला तलाठी नरसाळे यांनी फोन करुन कामासबधाने भेट घेण्यासाठी तहसिल कार्यालय ,आष्टी येथे बोलवल्याने.सदर बाबत मी पोनि/ परदेशी यांना कळवुन पुढील कारवाई करण्याची विनंती केल्याने पोनि/ परदेशी हे शासकिय पंच व सापळा पथकासह आष्टी येथे सुरक्षितस्थळी आले .पोनि/ परदेशी यांनी मला व दोन्ही पंचांना व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर व्हईस रेकर्डर चालु करुन माझ्याकडे देऊन मला तलाठी नरसाळे यांना फोन करुन भेटीचे ठिकाण संदर्भाने विचारले◌ असता तलाठी नरसाळे यांनी तहसिल कार्यालय ,आष्टी येथे बोलवले त्यावरुन तहसिल कार्यालय आष्टी येथे सापळयाचे आयोजन करण्यात आले .मी व पंच क्र.1 खाडे यांना तलाठी नरसाळे यांना भेटुन लाच रक्कम देण्यासाठी तहसिल कार्यालय ,आष्टी येथे रवाना करण्यात आले. आमचे पाठोपाठ सापळा पथक व पंच क्र.2 हे येत होते. मी व पंच क्र.1 असे दोघेही तहसिल कार्यालय आष्टी येथे गेल्यावर तेथे माझी व तलाठी नरसाळे यांचेत कामासंबधाने चर्चा झाली. त्यादरम्यान तलाठी नरसाळे यांनी माझेकडे पैशाची मागणी केली .त्यावर मी माझे उजवे हाताने पँटचे समोरील उजवे खिशातुन लाच रक्कम 3,000/- रुपये काढुन तलाठी नरसाळे यांना दिले असता तलाठी नरसाळे यांनी सदरची लाच रक्कम 3,000/-रु. ही उजवे हाताने स्वीकारुन त्यांनी परिधान केलेल्या शर्टच्या समोरच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवली. त्यानंतर मी मला लाच स्विकारल्या बाबतचा नेमुन दिलेला पुर्व नियोजीत इशारा केला. इशारा प्राप्त होताच पोनि/परदेशी हे पंच क्र.2 व सापळापथकासह आमचेजवळ आले. माझ्याकडील व्हईस रेकर्डर बंद केला. तेव्हा पोनि/परदेशी यांनी तलाठी नरसाळे यांना स्वत:ची, दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर पोनि/परदेशी यांनी पंच क्र.1 यांना पंच क्र.2 यांचेसमक्ष विचारणा केली की मला कोणी लाचेची मागणी केली व माझेकडुन कोणी लाच रक्कम स्वीकारली. तेव्हा पंच क्र.1 यांनी सांगितले की, तक्रारदार यांना तलाठी नरसाळे यांनी पैशाची मागणी करुन 3,000/-रु. लाच रक्कम स्वीकारली आहे, असा खुलासा पंच क्र.1 यांनी केला. त्यानंतर पोनि/परदेशी यांनी तलाठी नरसाळे यांना लाच रक्कमबाबत विचारले असता तलाठी नरसाळे यांनी सदरची लाच रक्कम ही त्यांचे शर्टचे समोरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवल्याचे सं◌ागितले. त्यानंतर पोनि/परदेशी यांनी तलाठी नरसाळे यांना त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारला असता त्यांनी त्याचे नाव जालिंदर गोपाळ नरसाळे वय-49 वर्षे व्यवसाय- नोकरी - तलाठी - सजा -पिंपळा,वाघळूज ,पिंपळगावघाट रा. गोरेगाव ता. पारनेर जि. अहमदनगर, ह.मु. लक्ष्मी आपार्टमेन्ट जामखेड नाका ,अहमदनगर असे सांगीतले त्यानंतर तलाठी नरसाळे कडील 3,000/- रुपये पंच क्र.2 यांनी पोनि परदेशी यांचे सुचने प्रमाणे ताब्यात घेतले. त्यानंतर घटनास्थळावर प्राथमीक कारवाई करुन तलाठी नरसाळे यांना घेऊन पुढील कारवाई कामी पोनि/ परदेशी सापळापथकासह पोलीस ठाणे आष्टी येथे आले . पोनि / परदेशी यांचे सुचने वरुन मी देखील पोलीस ठाणे आष्टी येथे हजर आलो.माझे सासरे लिंबराज बाबु शेळके रा.सुबेवाडी पोस्ट पिंपळा ता.आष्टी जि.बीड यांचे नावे मौजे पिंपळा शिवारात शेत गट नंबर 237, 239, मध्ये चार एकर शेती आहे. सदर शेताची सातबाऱ्यावर नोंद माझी सासु कमलबाई लिंबराज शेळके, माझी पत्नी आशाबाई नानासाहेब गागरे, व माझी मेव्हुणी राधाबाई दत्तोबा गव्हाणे यांचे वारसाची नोद मा.न्यायालयाचा हुकुमनामा आदेशा प्रमाणे करण्यासाठी तलाठी नरसाळे यांनी दि.29/04/2021रोजी 5,000/-रु. लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 3,000/- रु लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य करुन. दि.06/10/2021 रोजी स्वत: शासकीय पंचांसमक्ष लाच रक्कम 3000/- रुपये तहसिल कार्यालय, आष्टी येथे स्वीकारली असता लोकसेवक नरसाळे यांना लाचेच्या रकमेसह 17.40 वा. रंगेहात पकडले आहे. लाचरक्कम 3,000/-रु. पंचांसमक्ष तलाठी नरसाळे यांचेकडुन जप्त करण्यात आलेली आहे. तरी माझी जालिंदर गोपाळ नरसाळे वय-49 वर्षे व्यवसाय- नोकरी - तलाठी - सजा -पिंपळा,वाघळूज ,पिंपळगावघाट रा. गोरेगाव ता. पारनेर जि. अहमदनगर, ह.मु. लक्ष्मी आपार्टमेन्ट जामखेड नाका ,अहमदनगर यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.
समक्ष ( रविंद्र परदेशी ) पोलीस निरीक्षकलाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Salim Amar Chaous(I (Inspector)) / DGPSACM7401 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पो.ठाणे अमलदार
पो.स्टे. आष्टी जि.बीड

**Signature of Officer in Charge, Police Station** (पोलीस ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Salim Amar Chaous
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPSACM7401